# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१४/2754

दिनांक : 16 OCT 2014

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका संस्था

विषय : खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१४ - १५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीबाबतचे ऑनलाईन अर्जांबाबत सादर करावयाचे प्रमाणपत्र व हमीपत्र.................................

सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज भरुन घेऊन प्रस्ताव स्विकारण्यांत आले होते. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचशा संस्था विद्यार्थ्यांने अर्ज सादर केल्यानंतर संस्था स्तरावर समिती गठीत करुन विहीत कालावधीत विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करीत नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांकडून अपूर्ण अर्ज स्विकारुन सादर केले जातात. परिणामी विद्यार्थ्यांच्या अर्जांमध्ये या कार्यालयाच्या स्तरावरील छाननी पथकामार्फत त्रुटी काढल्या जातात. सदर त्रुटींबाबत संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ऑनलाईन प्रणालीच्या मेसेज बॉक्सद्वारे त्रुटींची पूर्तता करण्यांबाबत वेळोवेळी कळविण्यांत आले आहे. तरीसुध्दा संस्थांकडून त्रुटीपूर्ततेबाबतचा प्रतिसाद समाधानाकारक मिळालेला नाही. असे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारताना घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या मार्गदर्शक सूचना वेळोवेळी संस्थांना दिलेल्या आहेत. या कार्यालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावरील (*www.jdteromumbai.com*) ईबीसी/मायनॉरिटीच्या मेनुबॉक्स मध्ये सविस्तर मार्गदर्शक सूचना दि. ३०/०९/२०१३ रोजी प्रसारीत करण्यांत आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांची एक प्रत प्रिंट करुन आपल्या संस्थेच्या ईबीसी छाननी समितीला वाचण्यास द्यावी व तदनुषंगाने प्रत्येक अर्जाची छाननी करुनच शैक्षणिक वर्ष २०१४-१५चे प्रस्ताव या कार्यालयाकडे छाननी करण्याकरिता पाठवावेत.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून ईबीसीचे प्रस्ताव सादर करताना सोबतच्या नमुन्या अन्वये प्रमाणपत्र व हमीपत्र सादर करावे.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

(जी.बी. धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

ईबीसी पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जांचे प्रस्ताव सादर करताना
संस्थेने लेटरहेडवर सादर करावयाचे प्रमाणपत्र व हमीपत्र

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता या संस्थेतील एकूण ........ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत. त्यापैकी संस्थास्तरावर एकूण ....... अर्जांची छाननी, संस्थांतर्गत छाननी समितीमार्फत करण्यांत आली असून ....... एवढ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत.

| अर्ज प्रत्यक्ष<br>स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी | तपासणी<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी | अर्ज प्रमाणित<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|

## हमीपत्र

या संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता एकूण ....... अर्ज सादर करण्यांत येत असून सर्व अर्जांची छाननी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संस्थेमध्ये ईबीसी अर्ज छाननीकरिता गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यांत आली असून प्रत्येक अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे अचूक व योग्य जोडलेली आहेत. सोबतच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळल्यास व अर्ज नामंजूर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थाप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का